# महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र. : २२७९३१०१
Email: suresh.naik@nic.in

क्रमांक: जशिअ-२०१८/प्र.क्र.२४१/जल-७
मृद व जलसंधारण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : ०४ सप्टेंबर, २०१८

प्रति,
जिल्हाधिकारी (सर्व).

**विषय : जलयुक्त शिवार अभियान सन २०१८-१९ मधील क्षेत्र उपचार व नाला खोलीकरण संदर्भात सूचना.**

महोदय,

जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत सन २०१८-१९ साठी ६,२०० एवढ्या गावांचे उद्दिष्ट्य निश्चित करण्यात आले असून ३१ मार्च, २०१९ पर्यंत गावे जलपरिपूर्ण करावयाची आहेत. याकरीता जिल्हाधिकारी यांनी जलयुक्त शिवार अभियान सन २०१८-१९ अंमलबजावणी क्षेत्र उपचार व नाला खोलीकरणाची कामे करताना खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी.

१. नाला खोलीकरणाचे काम भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे तांत्रिक सल्ल्याने करण्यात यावे. याकरिता नाला खोलीकरण करण्यासाठी स्थळ योग्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडून घेण्यात यावे.
२. गाव आराखडे तयार करतांना प्रस्तावित क्षेत्र उपचार कामांची अंदाजपत्रके तयार करताना एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमासाठी वापरण्यात येत असलेल्या विहित नमुन्यांचा व मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करावा.

आपला,

(सु.द.नाईक)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत : १) प्रादेशिक जलसंधारण अधिकारी,मृद व जलसंधारण विभाग (सर्व)
२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)